Review of ReseaRch
ISSN: 2249-894X
Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 12 | Issue - 6 | March - 2023

# पंढरपूरतालुक्यातील सहकार चळवळीचा अभ्यास

राहुल चंद्रभान अंधारे
संशोधक विद्यार्थी

**ABSTRACT:**

सहकार क्षेत्रात पंढरपूर नावाजलेला तालुका आहे. येथील सुपीक जमीन, तालुक्याला मिळालेले नेतृत्व व त्यांची सामाजिक बांधिलकी यामुळे येथे सहकाराच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक प्रगती साधता आली. सहकाराची सुरुवात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरु झालेली असली तरी पंढरपूर तालुक्यात या अगोदर सहकार चळवळीची सुरुवात झालेली दिसते. पंढरपूर तालुक्याने महाराष्ट्राला सहकार चळवळीमध्ये एक आदर्श दाखवला आहे. सहकाराच्या माध्यमातून विकास साधता येतो. हे येथील उदयास आलेल्या सहकारी संस्थांनीदाखवून दिले आहे.




**KEY WORDS:** पंढरपूर, उद्योग, सहकार, संस्था, लोकप्रतिनिधी, कृषी औद्योगिक क्रांती, नेतृत्व, सुपीक, बँक.

## प्रस्तावना:

महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्णभारत देशात प्रसिद्ध असलेले पंढरपूर तीर्थक्षेत्र सहकार क्षेत्रातही अग्रेसर असलेला तालुका आहे. येथे भीमा (चंद्रभागा) नदीमुळे सुपीक प्रदेश व सोलापूर सारखे कापड व इतर उद्योगासाठी प्रसिद्ध शहर आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रतात उंच भरारी मारता आली. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सहकाराची विशेष भूमिका राहिलेली आहे. सहकाराच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल झाला. वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या माध्यामातून गावागावामध्ये पद्धतशीरपणे सहकाराच्या इमारती भक्कमपणे उभ्या राहिल्या. 'दि पंढरपूर अर्बन को- ऑप. बँक लि. पंढरपूर' सारख्या सहकारी बँकेने सर्वसामान्यांना सावकारीच्या फास्यातून बाहेर काढले. अर्थकरणातून समाजसेवा ही नवीन पद्धत पंढरपूर तालुक्याने महाराष्ट्राला दाखवून दिली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळ व त्याचा आर्थिक व सामाजिक जीवनावरील प्रभावाची चर्चा करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हयात सहकारी चळवळीची सुरुवात पंचवार्षिक योजनेच्या काळात मोठ्या प्रमाणात झाली. पहिली पंचवार्षिक योजना सुरु होण्याच्या पूर्वी या जिल्हयात ४७१ सहकारी सोसायट्या होत्या. त्यांची सभासद संख्या ८३,७०० एवढी हती. अडीच कोटी एवढे खेळते भांडवल त्यावेळी या क्षेत्रात जिल्हयामध्ये होते. १९५९-६० पर्यंत जिल्हयातील सहकारी संस्थांचीसंख्या १२९४ एवढी वाढ झाली. त्यांचे खेळते भांडवल रु. ६. ९१ कोटी होते.

पंढरपूर तालुक्यात पहिली प्राथमिक शेती पतपुरवठा सहकारी संस्था (वि. का. सेवा. सह. संस्था) भाळवणी ता. पंढरपूर येथे दि. ०३/११/१९११ रोजी स्थापन करण्यात आली. दुसरी सहकारी संस्था म्हणजे पंढरपूर अर्बन को- ऑप. बँक लि. या नावाने पहिली बँक पंढरपुरात स्थापन झाली. दि. २० मार्च १९१८ मध्ये पंढरपूर नगरपरिषद नं. १ कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित, पंढरपूर स्थापन झाली. २००४ पर्यंत अशा प्रकारच्या सहकारी संस्थांचीसंख्या २७ इतकी होती.

## पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला लाभलेले नेतृत्व:

सहकार चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी निष्ठावान नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्व हे लोकांकडून अपेक्षित कार्य करून घेण्यासाठी, त्यांच्या प्रयत्नांना योग्य प्रकारे निर्देशित करणारी, त्यांना कार्य प्रवृत्त प्रक्रिया आहे. नेतृत्व ही जबाबदारी स्वीकारण्याची व ती पार पडण्याची क्षमता आहे. नेतृत्वाशिवाय कोणतेही सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा आर्थिक चळवळ किंवा क्रांती शक्य नसते. पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीस सुद्धा असे महान नेतृत्व लाभले म्हणूनच तालुक्याचा सामाजिक व आर्थिक स्थर आज उंचावलेला दिसतो. त्यामध्ये प्रामुख्याने औदुंबर कोंडीबा पाटील ज्यांना पंढरपूर तालुक्याचे कृषी औद्योगिक क्रांतीचे जनक मानले जाते. माजी आमदार पांडुरंग भानुदास उर्फ तात्यासाहेब डिंगरे यांनी तालुक्यातील लहानमोठे व्यावसायिक, शेतकरी यांच्या मुलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी पंढरपुर शहरात व तालुक्याच्या वेगवेगळ्या भागात कृषी पतसंस्था, नागरी पतसंस्था स्थापन केल्या. वसंतराव काळेंनी सहकार चळवळीच्या वाढीसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. विशेषतः पंढरपूर तालुक्याच्या पश्चिमेकडील भागाचा कृषी विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. सहकार क्षेत्रात पंढरपूर तालुका अग्रेसर करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

यशवंतराव भाऊ यांनी सहकार चळवळीला केंद्रस्थानी मानून अखंडपणे समाजवादी विचारांचा पुरस्कार केला. आपल्या आयुष्याची जवळपास ८४ वर्षे समाजकार्यात घातले. पंढरपूर तालुक्यात सहकाराच्या चळवळीला एक दिशा देण्याचे बरेच वर्ष कार्य केले. तालुक्यामध्ये आणखीन एक नाव सहकार क्षेत्रात महत्वपूर्ण आहे ते म्हणजे प्रकाश बापूराव पाटील यांचे. पांडुरंग सहकारी साखर कारखानाच्या माध्यमातून त्यांनी सहकाराच्या माध्यमातून सर्व शेतकरी बांधवांची सेवा केलेली आहे. पंढरपूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील कर्तृत्वान नेतृत्व म्हणून प्रशांत सुधारक परिचारक यांना ओळखले जाते. सहकार, शिक्षण, समाजकारण, व राजकारण अशा विविधांगी क्षेत्रात त्यांनी दैदिप्यमान ठसा उमटवला आहे.

## पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळ व त्याचा आर्थिक व सामाजिक जीवनावरील प्रभाव:

सहकारी संस्थाच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्याचा आर्थिक व सामाजिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. तालुक्यातील आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नामध्ये पंढरपूर तालुक्यातील सहकार चळवळीला मोठे यश मिळालेले आहे. सहकार ही देशाची शक्ती आहे, तिचा पुरेपूर वापर पंढरपूर तालुक्याने केलेला आहे. सहकारी संस्थाच्या स्थापनेत, संचालनात व संवर्धनात सर्वसामान्यांचा सहभाग, सभासदांचा वाढता सहभाग महत्वाचा आहे. उत्पादक शेतकरी सामान्य जनता यांच्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात तसेच त्या चालवल्या जातात. सहकाराच्या माध्यमातून समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच पिळवणूक रोखण्याचाही प्रयत्न केला जातो. सहकारी संस्था चालक सामाजिक बांधिलकी मानून सहकाराचे संवर्धन करतात. या सर्व गोष्टी पंढरपूर तालुक्याच्या बाबतीत घडलेल्या आहेत. सहकारी संस्थाद्वारे गरिबी दूर करण्याच्या कामी त्यांच्या राज्यस्तरीय शिक्झार संस्थांनी व मोठ्या प्रथितयश संस्थांनी यात विशेष आवड दाखवली आहे. पंढरपूर तालुक्यात सहकारी संस्थाच्या माध्यमातून "लोकशाही मार्गाने आर्थिक, सामाजिक विकास, आर्थिक विकासाबरोबर सामाजिक न्याय, संपत्तीचे न्यायाधिष्ठित, वितरण, पिळवणूकीचे निर्मुलन' हे आपल्या शासनाने घोषित केलेले प्रत्यक्षात अंगीकारलेले सर्वसामान्य धोरण आहे. या धोरणानुसारच पंढरपूर तालुक्याची वाटचाल आहे.

## निष्कर्ष:

महाराष्ट्र सहकार क्षेत्रात देशात प्रसिद्ध आहे. सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुकाचे विशेष महत्व सहकार क्षेत्रात राहिले आहे. सहकाराच्या माध्यमातून अनेक नेतृत येथे उदयास आहे. सहकाराच्या माध्यमातून येथील जनतेची आर्थिक घडी बसवता आली. तसेच अनेक सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून सहकारी संस्थांनी सामाजिक प्रश्न सोडवलेले दिसून येतात. येथील सहकारी संस्थांनी आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याबरोबर शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यात विशेष योगदान दिल्याचे दिसते.

## संदर्भ ग्रंथ :

1. बाविसकर बी. एस., महाराष्ट्रातील साठोत्तर सहकारी चळवळी, भोळे भा. ल., किशोर बेडकिहाळ (संपा.), बदलता महाराष्ट्र, डॉ. एन. डी. पाटील गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकदमी, सातारा प्रथमावृत्ती, १६ जुलै २००३.
2. रूपनवर वसंतराव, पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे सामाजिक योगदान रोडे दीपक (संपा), सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे.

3. टाले (डॉ.) पद्माकर., महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान, जोगदंड (डॉ.) आनंद (संपा.) सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, ऑक्टो. २०१६.
4. घाणेकर (डॉ.) वि. वि., सहकारी चळवळीचे शंभर वर्षाचे अवलोकन व आव्हाने, इन्स्टिट्युट ऑफ डेव्हलपमेंट ॲण्ड एज्युकेशन, पुणे, २००४.
5. जुगळे (डॉ.) वसंतराव, योजना जुगळे, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दिशा आणि दशा, प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, १९९६.
6. कामत गो. स., सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट १९७९.
7. शिंदे वसंतराव, सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे २००४.